# PSI/STI/ASO पूर्व परीक्षा : 26 फेब्रुवारी 2022 – चालू घडामोडी प्रश्न

**वर्षनिहाय घटनांवर आधारित प्रश्न संख्या :**

- 2018 – 2 प्रश्न
- 2019 – 3 प्रश्न
- 2020 – 5 प्रश्न
- 2021 – 7 प्रश्न

--------------------

**एकूण 17 प्रश्न**

---

**घटकनिहाय विषयावर आधारित प्रश्न संख्या :**

- अहवालावर आधारित – 1 प्रश्न
- योजनेवर आधारित – 2 प्रश्न
- पहिल्या-वहिल्या घटनेवर आधारित – 2 प्रश्न
- विज्ञान-तंत्रज्ञानवर आधारित – 4 प्रश्न
- आर्थिक घडामोडीवर आधारित – 3 प्रश्न
- पुरस्कारावर आधारित – 4 प्रश्न
- संमेलनावर आधारित – 1 प्रश्न

--------------------

**एकूण 17 प्रश्न**

---

**1) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (NCRD) अहवालानुसार बालकांसंबंधी गुन्ह्याची माहिती निम्नप्रमाणे आहे:**

अ) 2018 मध्ये दरदिवशी 109 बालकांचे लैंगिक शोषण.

ब) 2018 मध्ये अशा 39827 घटना नोंदवल्या गेल्या.

क) 2018 मध्ये बालिकांवर बलात्कारांच्या 21401 घटना घडल्या.

ड) बालकांवर अत्याचारांच्या सर्वाधिक 2832 घटना महाराष्ट्रात घडल्या (2018).

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहेत ?

1) फक्त अ, ब आणि क  2) फक्त ब, क आणि ड

3) फक्त अ, क आणि ड  4) वरील सर्व

उत्तर : 4

---

DEVA JADHAVAR

**2) एड्स नियंत्रण विभाग हा खालीलपैकी .................... मध्ये विलीन करण्यात आला असून आता तो राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना (NACO) म्हणून ओळखला जातो.**

1) भारताची कुटूंब नियोजन संघटना
2) आरोग्य व कुटूंब कल्याण विभाग
3) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम
4) राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम

उत्तर : 2

---

**3) शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ व शैक्षणिक आस्थापना तसेच नोंदणीकृत अशासकीय संस्थानीही ऐतिहासिक ठिकाणे पाहता यावीत या उद्देशाने 'कारागृह पर्यटन' उपक्रम राबविणारे भारतातील पहिले राज्य कोणते आहे?**

1) राजस्थान
2) उत्तर प्रदेश
3) महाराष्ट्र
4) बिहार

उत्तर : 3

---

**4) जीसॅट-30 ची खालीलपैकी कोणती वैशिष्ट्ये आहेत ?**

अ) वजन - 3357 किग्रॅ

ब) उच्च गुणवत्तेची दूरदर्शन, दूरसंचार व प्रसारण सेवा देणार

क) 12 सी, 12 केयू बँड ट्रान्सपोन्डर ने सुसज्ज

ड) उच्च गुणवत्तेचा दळणवळण उपग्रह

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ आणि क
2) फक्त ब आणि ड
3) फक्त अ, क आणि ड
4) वरीलपैकी सर्व

उत्तर : 4

---

**5) सोनाली नवागुळ लिखित खालीलपैकी कोणत्या कादंबरीला 2021 चा 'मराठी साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला आहे ?**

1) स्वच्छंद
2) ड्रिम रनर
3) प्रकाशवाटा
4) मध्यरात्रीनंतरचे तास

उत्तर : 4

---

**6) अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार विजेते (2019) अभिजीत बॅनर्जी यांचा आजवरचा जीवनप्रवास पुढील मुद्यांमध्ये दिला आहे. त्याची पुनर्जुळणी करून योग्य पर्याय निवडा.**

अ) न्यूनतम आय योजना (न्याय) या भारतातील दारिद्र्य निर्मुलन योजनेच्या निर्मितीत योगदान दिले.

ब) 'गरीबीचे अर्थशास्त्र' या ग्रंथाचे लेखन.

क) इन्फोसिस पुरस्कार मिळाला.

ड) प्रेसिडेन्सी कॉलेज, कोलकाता येथून अर्थशास्त्राचे अध्ययन.

DEVA JADHAVAR

पर्यायी उत्तरे :

1) क, ब, ड, अ | 2) ड, ब, अ, क

3) ड, क, ब, अ | 4) क, ब, अ, ड | उत्तर : 3

---

**7) 2021 मध्ये लिओनेल मेस्सी याची खालीलपैकी कोणत्या पुरस्कारासाठी सातव्यांदा निवड झाली ?**

1) युरोपीयन गोल्डन शू | 2) वर्ल्ड प्लेअर ऑफ द ईअर

3) वर्ल्ड सॉकर प्लेअर ऑफ द इअर | 4) बॅलेन डी'ओर | उत्तर : 4

---

**8) 75 व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येस शांतीकाळातील वीरतेचे 'अशोक चक्र' पुरस्काराने कोणाला सन्मानित केले गेले ?**

अ) ए. एस. आई. बाबू राम

ब) पोलीस कॉन्स्टेबल अल्ताफ हुसैन

क) लेफ्टीनेंट गव्हर्नर गिरिष चंद्र मुरम्

ड) मिझोरामचे राज्यपाल, पी.एस. श्रीधरन पिल्लई

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ आणि ब | 2) फक्त क आणि ड | 3) फक्त ब | 4) फक्त अ

उत्तर : 4

---

**9) खालील विधाने लक्षात घ्या :**

अ) किवी हे भारतातील पहिले प्रमाणित सेंद्रीय फळ आहे.

क) अरुणाचल प्रदेश हे किवी फळासाठी प्रमाणित सेंद्रीय फळाचा दर्जा प्राप्त करणारे देशातील पहिले राज्य आहे.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बिनचूक आहे/आहेत ?

1) फक्त अ | 2) फक्त ब | 3) अ आणि ब दोन्ही | 4) वरीलपैकी कोणतेही नाही

उत्तर : 3

---

**10) प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) (PMAY-U) अंतर्गत 18 जानेवारी, 2021 पर्यंत .............. घरे मंजूर करण्यात आली होती.**

1) 68.1 लाख | 2) 128.8 लाख

3) 165.8 लाख | 4) 109.2 लाख

उत्तर : 4

---

DEVA JADHAVAR

**11) अवनी चतूर्वेदी, भावना कांत आणि मोहना सिंग यांनी भारतीय हवाई दलातील लढाऊ विमानाच्या पहिल्या महिला वैमानिक नियुक्त होवून कोणत्या वर्षी इतिहास घडविला ?**

1) 2015 2) 2016 3) 2017 4) 2018

उत्तर : 4

---

**12) कोणत्या अंतराळ अभिकरणाने सर्वप्रथम पूर्णत: इलेक्ट्रीक प्रायोगिक विमान 'एक्स–57 मॅक्सवेल' चा प्रारंभ केला ?**

1) लॅपॅन 2) इस्त्रो 3) सी.एन.ई.एस. 4) नासा

उत्तर : 4

---

**13) पी.एस.एल.व्ही. – सी. 48 (PSLV-C48) या प्रक्षेपकाच्या माध्यमातून भारताद्वारे 11 डिसेंबर, 2019 रोजी खालीलपैकी कोणता कृत्रिम उपग्रह अवकाशात सोडण्यात आला ?**

1) RISAT - 2BR1 2) EMISAT

3) CARTOSAT - 2B 4) GSAT - 31

उत्तर : 1

---

**14) 93 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत फादर फ्रांसिस दिब्रिटो यांच्या जीवनातील घटीतांचा आजअखेरचा क्रम सुयोग्य प्रकारे व्यक्त करणारा अचूक पर्याय निवडा.**

अ) 'सुबोध बायबल – नवा करार' ग्रंथासाठी साहित्य अकादमीचा राष्ट्रीय अनुवाद पुरस्कार.

ब) पुणे येथे 15 व्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

क) कॅथॉलिक धर्मगुरुपदाची दिक्षा.

ड) 'सुवार्ता' या वार्तापत्राचे मुख्य संपादक.

पर्यायी उत्तरे :

1) क, ड, ब आणि अ 2) ड, क, आणि ब

3) क, ब, अ आणि ड 4) ड, अ, ब आणि क

उत्तर : 1

---

**15) केंद्रीय अर्थसंकल्प 2021–22 मध्ये केंद्र सरकारच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत कोणता आहे ?**

1) वस्तू आणि सेवा कर 2) कर्ज घेणे आणि इतर दायित्वे

3) प्राप्तीकर 4) कॉर्पोरेट कर

उत्तर : 1

---

DEVA JADHAVAR

**16) मुख्य आर्थिक सल्लागार कृष्णमुर्ती सुब्रमण्यम (आर्थिक सर्वेक्षण 2020-21) यांच्या मते आर्थिक पुनप्राप्तीचे स्वरूप कसे असू शकते ?**

1) U-आकाराचे  2) S-आकाराचे  3) V-आकाराचे  4) Z-आकाराचे

उत्तर : 3

---

**17) भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्प, 2020 नुसार करपात्र उत्पन्नासाठी आयकर दरपातळी किती टक्क्यांपर्यंत आहे ?**

1) 5% ते 25%  2) 5% ते 35%  3) 5% ते 30%  4) 5% ते 20%

उत्तर : 3

---

**देवा जाधवर संपादित चालू घडामोडी**

**या पुस्तकातून कम्बाईन पूर्व परीक्षा फेब्रुवारी 2022 मध्ये 12 प्रश्न विचारण्यात आले आहेत. आगामी परीक्षेच्या तयारीकरिता 60 वी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झालेली आहे, ती आपण आवर्जून अभ्यासावी.**

